# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १६० वा ❑ भारतीय सौर दिनांक १६ श्रावण शके १९४८, शुक्रवार दि.०७ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## स्पेसएक्सचे रॉकेट चंद्रावर क्रॅश; अंतराळ कचऱ्याचा प्रश्न गंभीर

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

स्पेसएक्स कंपनीच्या रॉकेटचा सुमारे ४,००० किलोग्रॅम वजनी भाग अखेर चंद्राच्या पृष्ठभागावर प्रचंड वेगाने आदळला आहे. गेल्या सात ते आठ वर्षांपासून अंतराळात अनियंत्रितपणे फिरत असलेला हा तुकडा सुमारे ८,६९० किलोमीटर प्रतितास (जवळपास २.४१ किमी प्रतिसेकंद) या महाप्रचंड वेगाने चंद्राच्या दूरवरच्या भागात जाऊन आदळला. या घटनेमुळे पृथ्वीला किंवा पृथ्वीवरील मानवी जीवनाला कोणताही धोका नसल्याचे अमेरिकन अंतराळ संस्था नासाने स्पष्ट केले आहे.

२०१५ मध्ये स्पेसएक्सच्या फाल्कन ९ या रॉकेटच्या साहाय्याने डीप स्पेस क्लायमेट ऑब्झर्व्हेटरी हा उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करण्यात आला होता. उपग्रहाला त्याच्या नियोजित कक्षेत सोडल्यानंतर रॉकेटच्या दुसऱ्या टप्प्यातील इंधन संपले. गुरुत्वाकर्षणाच्या गुंतागुंतीच्या बलांमुळे हा तुकडा पृथ्वीवर परत येऊ शकला नाही किंवा सौरमालेतून बाहेरही जाऊ शकला नाही. परिणामी, सुमारे ४ टन वजनाची ही अजस्र धातूची रचना पृथ्वी आणि चंद्राच्या गुरुत्वाकर्षण कक्षेदरम्यान अनियंत्रितपणे फिरत राहिली.

अंतराळातील कचऱ्याचा वाढता धोका: स्पेसएक्सच्या दुर्घटनेनंतर निर्माण झालेला गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

नुकतीच घडलेली इलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीच्या रॉकेट अवशेषाची चंद्रावरील भीषण धडक ही केवळ एक खगोलशास्त्रीय बातमी उरलेली नाही, तर तिने संपूर्ण जगाचे लक्ष अंतराळातील कचरा या अत्यंत गंभीर विषयाकडे वेधले आहे. सुमारे ४,००० किलोग्रॅम वजनाचा आणि ८,६९० किलोमीटर प्रतितास या महाप्रचंड वेगाने फिरणारा धातूचा तुकडा जेव्हा चंद्राच्या पृष्ठभागावर आदळला, तेव्हा सुदैवाने कोणतीही मानवी हानी झाली नाही. मात्र, या घटनेने मानवजातीला एका मोठ्या संकटाची पूर्वसूचना दिली आहे, ज्यातून आपण पृथ्वीप्रमाणेच आता अंतराळ आणि चंद्रालाही कचऱ्याचे आगार बनवत आहोत का असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. मानवाने १९५७ मधील स्पुटनिक-१ प्रक्षेपणापासून आजपर्यंत हजारो उपग्रह आणि रॉकेट्स अंतराळात पाठवले आहेत, ज्यांचे कार्य संपल्यानंतर किंवा ते नादुरुस्त झाल्यावर हे सुटे भाग अंतराळातच फिरत राहतात. यामध्ये कार्यमुक्त झालेले उपग्रह, रॉकेटचे इंधन टँक्स, अपघातातील अवशेष आणि अंतराळवीरांच्या हातून सुटलेली साधने यांचा समावेश आहे. सध्या अंतराळात १० सेंटीमीटरपेक्षा मोठे सुमारे ३६,५०० हून अधिक तुकडे, १ ते १० सेंटीमीटरचे १० लाखांहून अधिक घातक भाग आणि १ मिलीमीटरपेक्षा लहान १३ कोटींहून अधिक कण ताशी २८,००० किलोमीटर या प्रचंड वेगाने फिरत आहेत, जिथे अवघा १ सेंटीमीटरचा लहान खडासुद्धा चालू उपग्रहाचा किंवा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाचा चक्काचूर करण्यास सक्षम असतो.

या वाढत्या कचऱ्यामुळे १९७८ मध्ये नासाचे शास्त्रज्ञ डोनाल्ड जे. केसलर यांनी मांडलेल्या केसलर सिंड्रोम या भयंकर परिस्थितीची भीती अधिक गडद झाली आहे. जर अंतराळातील कचऱ्याचे प्रमाण एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे गेले, तर कचऱ्याचा एक तुकडा दुसऱ्या उपग्रहावर आदळून साखळी प्रक्रिया सुरू होईल आणि पृथ्वीभोवती कचऱ्याचे असे एक अभेद्य कवच तयार होईल, ज्यामुळे संपूर्ण उपग्रह नेटवर्क नष्ट होऊन मानवाला पुढील शेकडो वर्षांसाठी अंतराळात कोणतेही नवीन यान पाठवणे पूर्णपणे अशक्य होऊन बसेल. आपले आजचे आधुनिक जीवन अंतराळातील उपग्रहांवर पूर्णपणे अवलंबून असल्याने याचा थेट फटका जीपीएस, मोबाईल नेटवर्क, टीव्ही ब्रॉडकास्टिंग, बँकिंग व्यवहार, हवामानाचे अंदाज आणि विमान तसेच सागरी वाहतुकीला बसून संपूर्ण जागतिक व्यवस्था ठप्प पडू शकते. याशिवाय, स्पेसएक्सच्या रॉकेट टप्प्याच्या या अपघाताने आतापर्यंत केवळ पृथ्वीच्या कक्षेपुरता मर्यादित असलेला कचऱ्याचा प्रश्न चंद्राच्या गुरुत्वाकर्षण क्षेत्रातही ओढला गेला आहे, ज्यामुळे भविष्यातील आर्टेमिस किंवा चंद्रयान यांसारख्या मानवी मोहिमा आणि तिथे उभारल्या जाणाऱ्या मून बेसच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, स्पेसएक्सच्या या दुर्घटनेने जागतिक समुदायाला जागे केले असून आता केवळ नवीन तंत्रज्ञान विकसित करणे पुरेसे नसून कठोर उपाययोजना राबवणे अनिवार्य झाले आहे. यासाठी मोहीम संपल्यानंतर रॉकेटचे भाग आपोआप पृथ्वीच्या वातावरणात येऊन जळून खाक होतील किंवा अंतराळातून बाहेर फेकले जातील अशा डी-ऑर्बिटिंग तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे.

तसेच, लेझर, रोबोटिक आर्म किंवा विशाल जाळ्यांचा वापर करून अंतराळातील निष्क्रिय उपग्रह गोळा करणारे कचरा हटवणारे तंत्रज्ञान विकसित करणे आणि आऊटर स्पेस ट्रीटी मध्ये सुधारणा करून अंतराळात कचरा सोडणाऱ्या कंपन्यांवर व देशांवर भारी दंडात्मक कारवाईचे कडक आंतरराष्ट्रीय कायदे करणे आवश्यक आहे. आपण पृथ्वीवरील महासागर आणि जमिनी कचऱ्याने दूषित केल्याच आहेत, परंतु आता अंतराळ आणि चंद्राला प्रदूषित करण्याचा अधिकार आपल्याला नाही. जर आपण आताच अंतराळ कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी कठोर पावले उचलली नाहीत, तर मानवाचे अंतराळात झेप घेण्याचे स्वप्न कायमचे कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली गाडले जाईल.

# ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे निधन


ज्योतिर्मय साहित्य

पुणे – 'डोह', 'सोन्याचा पिंपळ' आणि 'कोरडी भिक्षा' यांसारख्या साहित्यकृतींना वाचकांच्या मनात घर करून राहिलेले ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी (वय ९१) यांचे गुरुवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

फेब्रुवारीमध्ये खुब्याचे हाड मोडल्याच्या त्रासातून ते बरे झाले होते. पण, त्यानंतर त्यांची प्रकृती क्षीण होत गेली. गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास निवासस्थानी त्यांची प्राणज्योत मालवली. कराड येथे सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

ललित लेखनाची 'मौज' वाचकांपर्यंत संक्रमित करणारे समृद्ध लेखक

'डोह', 'सोन्याचा पिंपळ', 'पाण्याचे पंख' आणि 'कोरडी भिक्षा' यांसारख्या साहित्यकृतींतून ललित लेखनाची 'मौज' अनुभवताना वाचकांना समृद्ध करण्याचे काम श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांनी केले. अर्धशतकाहून अधिककाळ साहित्यसेवा करणारे व्रतस्थ लेखक काळाच्या पडद्याआड गेले आहेत.. श्रीनिवास कुलकर्णी यांचे लेखन महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न राहता धारवाड आणि कोलकतापर्यंत पोहोचले असून त्यांच्या साहित्याचा इंग्रजी अनुवाद झाला आहे.



सांगली जिल्ह्यातील औदुंबर या गावी जन्म झालेल्या श्रीनिवास यांचे प्राथमिक शिक्षण औदुंबरमध्येच झाले, तर सातवीपर्यंतचे शिक्षण अंकलखोप येथे झाले. त्यापुढील शिक्षण सांगलीच्या 'अनाथ विद्यार्थी आश्रम' या संस्थेत राहून पूर्ण केले. त्यांचे आजोबा व वडील दोघेही चित्रकार होते. या दोघांच्या सान्निध्यात होणारे कलेचे संस्कार आणि औदुंबरच्या परिसराच्या वातावरणाचा परिणाम यांमधून श्रीनिवास कुलकर्णी यांचे संस्कारशील, संवेदनक्षम मन तयार झाले. शिक्षण संपल्यावर प्रथम दोन वर्षे साइन बोर्ड पेंटिंगचा व्यवसाय व नंतर ओगलेवाडी येथील काचकारखान्यात हिशेब खात्यात नोकरी. त्यानंतर 'मौज' या नियतकालिकाच्या संपादन विभागात त्यांनी काम केले. कवितेवर आत्यंतिक प्रेम असलेल्या श्रीनिवास कुलकर्णी यांची पहिली कविता मराठी चौथीत असताना पां. ना. मिसाळ यांच्या 'बालसन्मित्र' मध्ये प्रसिद्ध झाली होती. पहिली गोष्ट का. रा. पालवणकरांच्या 'खेळगडी'च्या शेवटच्या बाललेखांकात प्रसिद्ध झाली. 'बालकवींच्या प्रतिभेने कविता न लिहिता गद्य लिहिले असते तर ते लेखन श्रीनिवास कुलकर्णी यांचेच झाले असते', अशा शब्दांत मंगेश पाडगावकर यांनी कुलकर्णी यांच्या लेखनाचे मोल उलगडले. 'मनातल्या उन्हात' हा त्यांचा ललित लेख १९६० मध्ये 'सत्यकथे'त प्रसिद्ध झाला. त्यांचे सर्व लेख प्रथम 'सत्यकथा' आणि 'मौज' या नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले. 'पाण्याचे पंख' या संग्रहात त्यांनी घरात आणि सभोवती असणाऱ्या, वावरणाऱ्या लहान मुलांचे भावविश्व साकारले आहे.

अलोक, पदम, मनू, मिकी या लहान मुलांचे हसणे, खेळणे, बागडणे हे लेखकाच्या नजरेतून टिपताना आपल्या सभोवतालच्या लहान मुलांच्या जगाशी त्यांचे नाते जुळलेले दिसते. 'कोरडी भिक्षा' या संग्रहातील व्यक्तिचित्रांच्या चित्रणातून पुन्हा वेगळे अनुभव वाचकांसमोर उलगडतात.

त्यांच्या सर्व लेखनाला चित्रदर्शी शब्दकलेची जोड लाभली आहे. चित्रकलेच्या संस्कारातून येणारी दृश्यमयता, निसर्गाच्या सूक्ष्म निरीक्षणामधून वर्णनात येणारा बारकावा आणि अनुभवाचा तळ गाठणारी पारदर्शी लेखनशैली यांमुळे कुलकर्णी यांच्या लेखांमधील आशय एक वेगळीच उंची गाठतो. ललित लेखनाला एक वेगळेच परिमाण देऊन हे लेखन समृद्ध करणारा लेखक म्हणून श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे नाव निश्चितच अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

अशा सारस्वताला महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने यापूर्वी साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. राज्य सरकारच्या 'विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारा'ने कुलकर्णी यांच्या शिपरेचात मानाचा तुरा खोवला गेला होता.

# शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याची ज्ञानशिदोरी – दिलीप गरुड

### लोकमंगल प्राथमिक विद्यामंदिर, एम.आय.डी.सी., कोडोली येथे सेवानिवृत्ती समारंभ उत्साहात; तीन दशकांच्या शैक्षणिक सेवेला मान्यवरांचा सलाम

ज्योतिर्मय साहित्य

सातारा – ''शिक्षक हा केवळ धडा शिकवणारा नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा दीपस्तंभ असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील ज्ञानाची शिदोरी म्हणजे शिक्षक. लोकमंगल प्राथमिक विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिका ज्योती नलवडे यांनी तब्बल २८ वर्षे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कार, शिस्त आणि जीवनमूल्ये रुजविण्याचे कार्य केले. त्यांनी घडविलेली विद्यार्थी पिढी हेच त्यांच्या कार्याचे जिवंत स्मारक असून त्यांचे संपूर्ण शैक्षणिक जीवन प्रेरणादायी आहे,'' असे गौरवोद्गार अमरेंद्र भास्कर मराठी साहित्य संस्था, पुणेचे कार्यवाह दिलीप गरुड यांनी काढले.

लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या लोकमंगल प्राथमिक विद्यामंदिर, एम.आय.डी.सी., कोडोली, सातारा येथील मुख्याध्यापिका ज्योती प्रकाश नलवडे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित निरोप समारंभात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था, साताराचे अध्यक्ष शिरीष चिटणीस होते. प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या माजी विद्यार्थिनी धनश्री सातपुते-जाधव उपस्थित होत्या. व्यासपीठावर संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस, संचालक भानुदास साबळे, सागर कांबळे, सतीश पवार, मुख्याध्यापक विजय यादव, कल्याण भोसले, शशिकांत जमदाडे, शांताराम पवार, प्रकाश नलवडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी, पालक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

दिलीप गरुड पुढे म्हणाले, ''हाडाचा शिक्षक हा विद्यार्थ्यांशिवाय राहू शकत नाही. जशी भाकरी माणसाच्या पोटाची गरज आहे, तशीच विद्यार्थ्यांची ओढ शिक्षकाच्या मनाची गरज असते. शिक्षकाला खरी कमाई वेतनातून मिळत नाही; ती विद्यार्थ्यांच्या यशातून मिळते. नलवडे मॅडम यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देत शिक्षणासोबतच चारित्र्य, शिस्त आणि सामाजिक मूल्यांचीही जोपासना केली. आज विविध क्षेत्रांत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या कार्याचे प्रतिबिंब दिसून येते.''

अध्यक्षीय समारोपात शिरीष चिटणीस म्हणाले, ''शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार असतो. विद्यार्थ्यांची क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशा देण्याची विलक्षण क्षमता नलवडे मॅडम यांच्याकडे आहे. गेल्या जवळपास तीन दशकांत त्यांनी सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांना घडविले. आज हे विद्यार्थी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. हीच त्यांच्या सेवेला मिळालेली सर्वोच्च पावती आहे.''

प्रमुख पाहुण्या धनश्री सातपुते-जाधव यांनी विद्यार्थीदशेतील आठवणींना उजाळा देताना सांगितले, ''नलवडे मॅडम आम्हाला प्रेमाने शिकवत असतानाच शिस्तीचे धडेही देत असत. शिक्षकांचे प्रेम आणि संस्कार आयुष्यभर साथ देतात. मजबूत इमारतीसाठी जसा भक्कम पाया आवश्यक असतो, तसाच आमच्या आयुष्याचा पाया त्यांनी घातला. माझ्या यशामागे त्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद मोलाचे आहेत.''

संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस म्हणाल्या, ''ज्योती नलवडे यांचा स्वभाव अत्यंत नम्र, संयमी आणि विद्यार्थ्यांवर ममत्वाने प्रेम करणारा आहे.त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञानच नव्हे, तर संस्कार आणि सामाजिक जबाबदारीची जाणीवही निर्माण केली. त्यांच्या निवृत्तीनंतरही त्यांचा अनुभव समाजासाठी मार्गदर्शक ठरेल.'' मुख्याध्यापक विजय यादव यांनी आपल्या मनोगतात सांगितले, ''शाळा ही विद्यार्थ्यांचे मन, मनगट आणि मेंदू घडविणारी प्रयोगशाळा आहे. नलवडे मॅडम यांनी २८ वर्षे अहोरात्र परिश्रम घेऊन शाळेच्या गुणवत्ता वृद्धीत मोलाचा वाटा उचलला. त्यांच्या कार्यामुळे शाळेची सामाजिक प्रतिष्ठा अधिक उंचावली.''



सागर कांबळे म्हणाले, ''विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि जिद्द निर्माण करण्याचे कार्य नलवडे मॅडम यांनी सातत्याने केले. आयुष्यभर कमावलेली माणसे ही कोणत्याही संपत्तीपेक्षा अधिक मौल्यवान असतात. विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनात त्यांनी निर्माण केलेले स्थान हीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई आहे.''

प्रकाश नलवडे यांनी संस्थेतील शिक्षक, कर्मचारी आणि सहकाऱ्यांचे योगदान अधोरेखित करताना सांगितले की, ''सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून शाळा उत्कृष्टतेच्या शिखरावर पोहोचली असून या प्रवासात प्रत्येक कर्मचाऱ्याचे योगदान महत्त्वाचे आहे.''

ज्ञानेश्वर मोहटकर यांनी ज्योती नलवडे यांचा उल्लेख ''मातृहृदयी शिक्षिका'' असा करत त्यांच्या विद्यार्थीप्रेमाचा आणि पालकांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा गौरव केला. संदीप जाधव यांनी शाळेचे वातावरण आनंदी, सकारात्मक आणि विद्यार्थीकेंद्री ठेवण्यात त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली.

सत्काराला उत्तर देताना ज्योती नलवडे भावुक होत म्हणाल्या, ''या विद्यालयाशी माझे अतूट भावनिक नाते आहे. माझ्या घरातील पंधरा मुले याच शाळेत शिकली आहेत. या विद्यालयातून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशस्वी झाले, हेच माझ्या आयुष्यभराच्या सेवाकार्याचे खरे फलित आहे. गेले २८ वर्षांचा प्रवास संस्था, सहकारी, विद्यार्थी आणि पालक यांच्या सहकार्यामुळे अत्यंत आनंददायी ठरला. या प्रेमाची आणि आपुलकीची आठवण मी आयुष्यभर जपून ठेवेन.''


यावेळी ज्योती नलवडे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थी, पालक आणि सहकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत त्यांच्या दीर्घ, निरोगी आणि आनंदी आयुष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

या कार्यक्रमास गुलाब पठाण, यू. जी. जाधव, काकासो निकम, बाळकृष्ण इंगळे, वैशाली वाडीले, प्रतिभा वाघमोडे, सुजाता शिंदे, चंद्रकांत देवगड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक कल्याण भोसले यांनी केले. सूत्रसंचालन संदीप जाधव यांनी केले, तर हणमंत खुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.


भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद

जिल्हा शाखा – छत्रपती संभाजीनगर आयोजित

'पुस्तकावर बोलू काही – चर्चासत्र'




महाराष्ट्रातील नामवंत बालसाहित्यीक मा. डॉ. विशाल तायडे यांच्या 'ढ' या बहुचर्चित बालकादंबरीवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. तरी आपण उपस्थित रहावे.

अध्यक्ष
मा. डॉ. संतोष चव्हाण
विभाग प्रमुख (मराठी विभाग), शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड, ता. पैठण
सदस्य – मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

भाष्य
मा. प्रा. ईश्वर आडसुळ
मराठी विभाग – विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रमुख उपस्थिती

मा.डॉ. सर्जेराव जिगे
अध्यक्ष-मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, छ. संभाजीनगर
अध्यक्ष-मराठी भाषा परिषद, छत्रपती संभाजीनगर

मा.डॉ. मंजुषा क्षीरसागर
वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर

मा.डॉ. शिवाजी हुसे
विभाग प्रमुख (मराठी विभाग), शिवाजी महाविद्यालय, कन्नड
कार्याध्यक्ष- भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, छ. संभाजीनगर

मा. नरहरी शिवपुरे
सचिव – ग्रामविकास संस्था, छत्रपती संभाजीनगर

सूत्रसंचालन – विजयकुमार पांचाळ    आभार – डॉ. दैवत सावंत

संयोजक : सुनील डोके (जिल्हाध्यक्ष) अशोक शेवगन (कार्याध्यक्ष), डॉ. जयश्री कुमावत (उपाध्यक्ष), विजयकुमार पांचाळ (उपाध्यक्ष), डॉ. दैवत सावंत,(सचिव) माधुरी चौधरी (सहसचिव) , डॉ. संजय शिंदे (संघटक), प्रा. नागेश बोनतेवाड (सह संघटक), सुनिता कपाळे (कोषाध्यक्ष) प्रा. पंजाबराव मोरे (प्रसिद्धीप्रमुख) (कार्यकारिणी सदस्य) – संजय खाडे, संजय प्र. गायकवाड, उज्वला कोंडके, प्रिया धारुरकर, वृषाली सोनवणे

मंगळवार, दिनांक : ११ ऑगस्ट २०२६, सायं. ०५.३० वा., स्थळ- ग्रामविकास भवन, राष्ट्रमाता जिजाऊ चौक, ठाकरे नगर, एन-२, सिडको, छत्रपती संभाजीनगर



# जात्यावरच्या ओव्या......


चल चल मह्या जीवा
ठेव नजर समोर
चाल एकेक पाऊल
गळा पडतील हार ||७८२||

भरला बाजार
घेते भाजीपाला
शेपू पालक मेथी
लई भाव गवारीला ||७८३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६०

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

निधी म्हणजे कुबेराचा खजिना असे आपण वर म्हटले आहे. परंतु निधी या शब्दाचा अर्थ या ठिकाणी आणखी वेगळा आणि थोड्या व्यापक अर्थाने घेता येईल. निधी म्हणजे साठा. निधी म्हणजे समुद्र. श्रीराम म्हणजे गुणांचा साठा, दयेचा आणि करुणेचा समुद्र. आपल्या भक्तांची कधीही उपेक्षा न करणारा असा तो आहे. त्याच्या गुणांचे काय वर्णन करावे? त्यासाठी शब्द कमी आहेत. तो कोणासारखा बरं आहे ? तर त्याच्यासारखा तोच !

अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशील दो कराने ? असा तो आहे. तो द्यायला बसला की आपली झोळी अपुरी पडेल. म्हणून काही मागायचे तर त्याच्या जवळच मागावे. जो सगळे काही आहे जो, सारसर्वस्व आहे, त्याच्याजवळ मागण्याचे सोडून इतरांजवळ मागण्यात काय हशील ?



व्यवहारामध्ये आपली इच्छापूर्ती किंवा वासनापूर्ती करणारी सारी साधने गौण आहेत. त्या इच्छा, त्या वासना कधी संपतच नाहीत. भगवंत जेव्हा आपली इच्छापूर्ती करतो, तेव्हा काही मागायचे राहतच नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात,'' काय उणे आम्हा विठोबाचे पायी ?'' अशी भक्ताची अवस्था होते. मन शांत, तृप्त होते आणि अत्यंत सामर्थ्यशाली बनते. कोणतीही आणि कशीही विपरीत परिस्थिती आली तरी ज्याची भगवंतावर श्रद्धा आहे, असा भक्त डगमगत नाही. असे समाधान देणारा भगवंत हा एकमेवाद्वितीय आहे. त्याची बरोबरी कशानेही होणार नाही.

स्वसंवाद : १) मी माझ्या इच्छा पूर्ण करण्यासाठी बाह्य साधनांवर जास्त अवलंबून आहे का, की परमेश्वरावर विश्वास ठेवतो?


२) ''मला अजून काही हवे आहे'' ही भावना माझ्यात कितपत आहे? की '' मला खरोखर काय उणे आहे?'' अशी तृप्तीची भावना आहे?

३) मी जे मागतो, ते खरोखर माझ्या कल्याणासाठी आहे का, की केवळ वासनापूर्तीसाठी आहे?

४) माझ्या जीवनात ''सार'' आणि ''असार'' यातील फरक मला स्पष्टपणे कळतो का?

५) मला भगवंत ''सर्वस्व'' वाटतो का, की अजूनही इतर गोष्टींमध्येच माझा जास्त विश्वास आहे?

(क्रमश:)





## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559




### ✍️ भरती-ओहटी

भरती ओहटी हा निसर्गाचा नियम आहे, ही प्रत्येकाच्या आयुष्यात येत असते. फक्त, भरती आली म्हणून माजू नये आणि ओहटी आली म्हणून खचून जाऊ नये, ही आपल्या परीक्षेची वेळ असते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# भगवंताच्या संयोग-वियोगातच खरे सुख दुःख आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

हल्ली लोकांचे हित करण्यासाठी जो तो झटत असतो, पण आपले स्वत:चे हित साधल्याशिवाय दुसऱ्याचे हित आपण काय साधणार? ज्याला स्वत:ला सुधारता येत नाही, तो दुसऱ्याला काय सुधारणार ? त्यालासुद्धा अभिमानच आड येतो, कारण त्याला वाटते, ' आपण दुसऱ्याचे हित करून देऊ.' या अभिमानाने तो फुगलेला असतो. अहंकार जाण्यासाठी साधनच करावे लागते, आणि ते साधन गुरू सांगत असतात. म्हणून, त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागले म्हणजे आपले हित होते. ब्रह्म हे काही कुठे शोधायला जावे लागत नाही. ते आपल्या जवळच असते; पण ते दुसऱ्याने आपल्याला दाखवावे लागते. हेच काम सद्गुरू करीत असतात. श्रीकृष्ण प्रत्यक्ष परब्रह्म, अवतार घेऊन वसुदेवाचे पोटी आले. परंतु, वसुदेव त्यांना आपला मुलगाच समजत होते तोपर्यंत, प्रत्यक्ष परमात्मा घरी असूनही ओळख पटली नाही. तेच, नारदांनी जेव्हा त्यांना सांगितले की, ' श्रीकृष्णाला आपला मुलगा न समजता तो परब्रह्म आहे असे समजा म्हणजे तुमचे हित होईल, ' तेव्हा खरी ओळख पटली. तसेच, राम अवतारी असूनही, वसिष्ठांनी जेव्हा सांगितले की, ' तूच प्रत्यक्ष परब्रह्म आहेस, ' तेव्हाच त्याला ते ज्ञान झाले. आता हे जरी केवळ आपल्याला दाखविण्याकरिता असले, तरी त्याचा अर्थ हा की, गुरूने दाखविल्याशिवाय तो परमात्मा भेटत नाही. गुरू तरी काय सांगतात ? नामस्मरण हेच साधन म्हणून ते सांगतात. ते दिसायला जितके सोपे तितकेच करायला कठीण असते; ते कठीण आहे म्हणून सोडून देऊ नये. आपण देवाला शरण जाऊन साधन करायला लागावे. म्हणजे ते करायला तो परमात्मा शक्ती देतो.

जगात खरे सुख नाही आणि दु:खही नाही. जगात सुखदु:ख आहे असे जे आपल्याला वाटते ते अपुरे आहे; ते तात्पुरते आहे. खरे सुखदु:ख भगवंताच्या संयोग-वियोगामध्येच आहे. खरे पाहता आपली बुद्धी लवचिक आहे; आपल्या वृत्तीवर कशाचाही परिणाम होतो. म्हणून आपल्या मागे भगवंताचा आधार हवा. आपण त्याचे आहोत, आणि जे जे होते ते त्याच्या इच्छेने होते, असे समजून वागावे. भूक लागली तर आईजवळ खायला मागावे, पण चोरी करू नये; तसे पोटापुरते भगवंताजवळ मागावे, पण जास्त मागू नये. भगवंत अत्यंत जवळ आहे आणि अत्यंत दूरही आहे. तसाच तो सर्वव्यापी आहे. म्हणून तो आपल्याला दिसत नाही. आपण दरवर्षी भगवंताचा जन्म करतो; याचा अर्थ असा की, मागच्या वर्षी आपण जन्म केला हे विसरलो, म्हणून या वर्षी पुन: त्याचा जन्म करावा लागला ! खरे म्हणजे भगवंताचा वाढदिवस करायला पाहिजे. भगवंत काल होता, आज आहे, आणि उद्या राहणारच; म्हणून त्याचा खरा वाढदिवस होऊ शकतो. भगवंताचे अस्तित्व आपण जागृत ठेवले, तर दरवर्षी जास्त उत्साह वाढेल आणि आनंदाचा वाढदिवस होईल.

रामनाम जाणा अक्षरे दोन । गुरूमुखे करावी ओळखण ।।

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## संत श्रेष्ठ जनाबाई यांचा अभंग

हे सामर्थ्य पूर्वी संकल्पा द्वारे ही होत असे. आपण दाखवलेल्या अन्नाचा नैवेद्य पेक्षा या पंचप्राणांचा नैवेद्य अधिक महत्त्वाचा आहे. व आपल्या जठरात झालेला हा यज्ञ आणि त्यात या पंच प्राणाची मिळालेली दिव्य आहुती सर्वात जास्त महत्त्वाची आहे. हे आपण लक्षात घ्यावे) शुद्ध अपान हा धर्मराज आहे, तर अशुद्ध किंवा दुष्ट झालेला अपान हा गुदद्वारातून पादरूपाने बाहेर पडतो. हाच यमराज म्हटला जातो. आपल्या पचन संस्था जर उत्कृष्ट कार्यरत असेल तर आपला अपान दुष्ट होणार नाही. पंच प्राणाचा आपसात संग होऊन ज्वलनशील होतो, आणि सुशूमनेतून मस्तकाकडे म्हणजे सहस्त्रार चक्राकडे सरकारला लागतो. या मुळे योगाग्नी पेटतो आणि यात कर्मबीजे भस्म सात होतात.(पाप जळून जाते) श्वासामधील कार्बन डाय-ऑक्साइड हा वायू फक्त ऊश्वास्वाद्वारे बाहेर पडावा व उर्वरित सर्व प्राण इंधन म्हणून वापरल्या जावा हे अपेक्षित आहे. प्राण हा खाली वाहणे ऐवजी वर वहायला लागला की त्यासोबत मन ही विषयाकडून परावृत्त होऊन आत्म्याच्या दिशेने वळते. बुद्धीही विषयाकडे कुंठीत होऊन आत्म्याकडे वळते. सर्व शरीरास देह भावाची जाणीव देणारा अहंकार लीन होतो ,आणि आत्म दर्शनासाठी शरीर सिद्ध व्हायला लागते. येथे मनाची वळवळ कमी होते. विचारांचा उद्भव थांबतो. मन निष्पन्द होते, आणि ते एकाग्र होऊन शेवटी मरणासन्न होते. हीच समाधीची अवस्था आहे. या समाधी अवस्थेत अखंड असा आनंदाचा स्त्रोत साधकास अनुभवता येतो आणि त्याची आत्मसाक्षात्कार होण्याकडे वाटचाल होते. ही दिव्य वाटचाल होण्यासाठी प्राणवायूचे उर्ध्वगमन किती आवश्यक आहे हे आपणास आता कळालेच असेल.

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### हवा-पाणी आणि वातावरण आणि डेटा सेंटर

निसर्गातील या पृथ्वीवर जैविक-अजैविक घटकाचे संतुलन थेट आपल्या स्वास्थ्यासी निगडित आहेतहे मानसाने लक्षात ठेवावे. आजच्या वेगवान औद्योगिक शहरीकरणात पर्यावरण संरक्षण एक मोठा मुद्दा आहे. स्वच्छ हवा शुध्द पाणी, सुपीक माती व शांत वातावरण हे आरोग्याचे स्तंभ आहेत. त्यासाठी टेस्टिंग अर्थात चाचण्या व ऊपयोगी डेटा सेंटर महत्वाची भुमीका बजावतात, म्हणून सर्व शहरातून पर्यावरण संदर्भात सगळे अभ्यास हे डेटावर भर देतात. आकाश जमीन व सागरातही ऊपगृहाच्या माध्यमातून गोला केला जातो. त्याआधारे उपाययोजना, धोरणे, दुरूस्ती केल्या जातात. हवेची गुणवत्ता, पाणी परीक्षण, माती परीक्षण, आणि ध्वनीप्रदूषण याच्या तपासणीची सोय होते. मगऊद्योग, वाहतूक, आरोग्य, दररोजचे जीवन यावर ऊपाय करून सुलभता आणली जाते. प्रयोगशाळेत मिळणार्या योग्य डेटाद्वारे संशोधक, शासकीय यंत्रणा, ऊद्योग कार्यालयात, संस्था, दुकानात, माल यांना योग्य निर्णयासाठी खूप ऊपयोगी व महत्वपूर्ण ठरत आहेत. त्यासाठी आधीच योजना ऊपाय राबवून संतुलन या संस्था करतात, त्यासाठी कायदे तरतूद करतात. आज एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निग आणि ईथे थांबतो आपण वाचत राहा सुख दु:खाचे तरंग माणसा - माणसाचे .



# पावसाळ्यात होणाऱ्या चिखल्या

ज्योतिर्मय साहित्य

पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे पोटदुखी, जुलाब, टायफॉइड किंवा काविळीसारखे आजार होण्याचा धोका खूप जास्त असतो.

त्यामुळे या दिवसांत पाणी शुद्ध करून पिणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पावसाळ्यात पाणी शुद्ध करण्याच्या आणि ते सुरक्षितपणे पिण्याच्या काही सोप्या व प्रभावी पद्धती खालीलप्रमाणे आहेत:

१. पाणी शुद्ध करण्याच्या सोप्या पद्धती

– पाणी उकळणे (सर्वात उत्तम उपाय):– पाणी कमीत कमी *१० ते १५ मिनिटे* कडकडवून उकळावे. उकळल्यामुळे पाण्यातील सर्व प्रकारचे हानिकारक जिवाणू आणि विषाणू नष्ट होतात. पाणी उकळल्यानंतर ते थंड होऊ द्या आणि नंतरच गाळून वापरा.

– तुरटी फिरवणे: जर पाणी खूप गढूळ असेल, तर पाण्यात स्वच्छ धुतलेली फिटकी २–३ वेळा गोल फिरवावी. यामुळे पाण्यातील माती आणि गाळ खाली तळाशी बसतो. वरचे स्वच्छ पाणी नंतर दुसऱ्या भांड्यात काढून उकळून घ्यावे.

– क्लोरीनच्या गोळ्या किंवा लिक्विड ():* पूर किंवा जास्त पावसाच्या काळात विहिरीचे किंवा नळाचे पाणी जंतूमुक्त करण्यासाठी क्लोरीनच्या गोळ्या किंवा थेंबांचा वापर करता येतो. साधारण १ लिटर पाण्यासाठी डॉक्टरांनी किंवा औषध दुकानात सांगितलेल्या प्रमाणातच याचा वापर करावा आणि पाणी अर्ध्या तासानंतर प्यावे.

पावसाळ्यात पाणी कसे व कुठे साठवावे?

– स्वच्छ भांडी : पाणी साठवण्यासाठी तांबे, पितळ, स्टेनलेस स्टील किंवा काचेच्या स्वच्छ भांड्यांचा वापर करा.

– भांडी झाकून ठेवा : पाणी साठवलेले भांडे नेहमी स्वच्छ झाकणाने व्यवस्थित झाकून ठेवा, जेणेकरून त्यात धूळ किंवा कीटक पडणार नाहीत

– हात न बुडवता पाणी काढा : भांड्यातून पाणी काढताना थेट हात किंवा पेला आत बुडवू नका. पाणी काढण्यासाठी लांब दांड्याच्या पळीचा (ओगराळे) वापर करा.

३. पाणी पिण्याचे काही महत्त्वाचे नियम

– कोमट पाणी प्या : पावसाळ्यात हवामानात गारवा असतो आणि पचनशक्ती थोडी मंदावते. त्यामुळे शक्यतो दिवसभर हलके कोमट पाणी पिणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते.

– बाहेरचे पाणी टाळा : प्रवासात किंवा बाहेर जाताना घरूनच उकळलेले पाणी सोबत घेऊन जा. बाहेरचे उघड्यावरील पाणी, बर्फ घातलेले ज्यूस किंवा दूषित पाणी पिणे पूर्णपणे टाळा.

– तहान नसली तरी पाणी प्या : पावसाळ्यात घाम कमी येत असल्याने तहान लागत नाही, पण शरीराला पाण्याची गरज असतेच. त्यामुळे ठराविक अंतराने पाणी पीत राहा. पावसाळ्यात फक्त ''उकळून थंड केलेले पाणी'' पिण्याची सवय ठेवली, तर तुम्ही आणि तुमचे कुटुंब पावसाळी आजारांपासून दूर राहू शकता.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### चिंतन


सुप्रभाती करावे सर्वांनी
चिंतन प्रभूचे खरे
आनंदी होते मन
मिळून नव प्रेरणा
उत्साह अंग संचारता
यशस्वी होईल जीवन

सुंदर या चिंतनात
सामावलेली आहे खरोखरी
अफाट छान शक्ती
मुर्ती विठूची मनी
मुखी हरी नामाची
करावी सदा भक्ती

# जीवन मूल्ये शिकविणारं पुस्तक ''श्यामची आई''

**ज्योतिर्मय साहित्य**

मानवी जीवनाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण. मनुष्य जीवनातील सर्वात महत्त्वाचा घटक वा अंग म्हणजे ''पुस्तके''. शिवाय पुस्तकांच्या मानवी जीवन अधुरे वा अपुरे आहे. आयुष्यातील अनुभवांची अनुभूती म्हणजे पुस्तक. नैतिकता, नीतिमत्ता, सु-विचार, सु-संस्कार आणि नीतीमूल्ये या सर्व गोष्टींची जडण-घडण केवळ पुस्तकांच्याच माध्यमातून होते. म्हणूनच, आपल्या प्रत्येकाच्या म्हणजे मानवी जीवनाच्या सर्व प्रकारच्या जडणघडणीत पुस्तकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पुस्तक वाचनामुळे आपला बौद्धिक, वैचारिक व भावनिक विकास तसेच स्तर उंचावण्यास मदत होते. ज्ञानाची परिपूर्णता म्हणजे पुस्तक वाचन.




कित्येक प्रकारची पुस्तके आहेत. ज्यामधून आपण परिपूर्णरित्या घडतो. आपला परिपूर्ण विकास होतो. आपण आपल्य जीवनात पुस्तके वाचनातून रुजवली की अनुभवाचे साक्षात्कार व आत्मोन्नती लगेचच होते. पुस्तकांमुळे आपण केवळ ज्ञानच मिळवू शकतो असे नाही. तर, पुस्तकांमुळे आपण आपल्या आयुष्यातील प्रत्येक अनुभवाकडे, सुखः, दुःखाकडे, प्रत्येक गोष्टींकडे निरपेक्ष भावनेने बघत असतो. आपल्या महाराष्ट्रातील अतिशय गाजलेले पुस्तक. ''श्यामची आई''. या पुस्तकामुळे कितीतरी आयुष्य घडवली वा घडली. श्यामची आई पुस्तक म्हणजे प्रत्येकाच्या जगण्याचा एक सुखःकर मार्गच होय. तो मार्ग ज्यावर कुठल्याही प्रकारच्या अडचणी वा खड्डे जाणवणारच नाहीत. साने गुरुजींच्या सात्विक लेखणीतून उतरलेलं ''श्यामची आई'' हे पुस्तक. या पुस्तकात साने गुरुजींच्या आईंनी त्यांना जीवनावश्यक जी मौल्यवान मूल्ये सांगितली आणि समजावून सांगत शिकविली आहेत ती खालील प्रमाणे.

१) आपण आपल्यापेक्षा मोठ्यांचा आदर करावा. त्यांचे आदरातिथ्य करावे. ते आदरातिथ्य जपावे. यातून आपल्या सु-संस्कारांची ओळख होते.

२) आयुष्यात कुठलाही किंवा कितीही बेताचा प्रसंग आला तरी खोटे कधीच बोलू नये. कारण, एकदा खोटे बोलण्याची सवय लागली की, ती सवय सवयच बनून जाते. कधीही न सुटणारी. एक खोटे लपवीताना आपण हजार खोटे बोलतो. म्हणून एखाद वेळेस ओरडणी खावी लागली हरकत नाही मात्र, खोटेपणाच्या वाटेला चुकूनही जाऊ नये.

३) आपण ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणच्या आपल्या आजू-बाजूच्या शेजारधर्मास प्रथम प्राधान्य द्यावे. कारण अनोळखी शेजार असतं. त्या शेजारधर्मातील माणुसकी कधीच अनोळखी नसते. आपण आपल्या मधुर वाणीमुळे गोडवा निर्माण करून शेजारधर्म नक्कीच घट्ट करू शकतो.

४) घरातील भाऊबंदकी आत्मीयतेने आणि काळजातून जपावी. त्यामुळे ते प्रेम कधीच कमी होता कामा नये.

५) मुक्या प्राणी मात्रांवर जीव लावणे. त्यांच्यासाठी खाण्या-पिण्यासाठीची सोय करून ठेवणे. मुक्या प्राण्यांनाही जीव असतो. म्हणून मुक्या जनावरांची, पशु-पक्षी, प्राणी मात्रांची मनोभावे काळजी बाळगावी.

६) जी गोष्ट थोड्याफार प्रमाणात का होईना पण आपल्याकडे आहे. पण तीच गोष्ट इतरांकडे नाही. तर त्या गोष्टीचे सुखः, त्यातले समाधान आपण त्या सर्वांना द्यावे. आपण आपल्या सुखाःच्या आधी इतरांच्या सुखाःचा विचार करावा. यामुळे एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा, आत्मीयता वाढून माणुसकीचे खरे नाते आपुलकीने जन्माला येते.

७) एक वेळ उपाशी राहावे मात्र चोरी कधीच करू नये. चोरी करणे म्हणजे आपण स्वतः आपल्या नजरेत उतरणे होय. खरे तर चोरी करणे म्हणजे एक प्रकारे पापच होय. याहून इतर कुठलेच मोठे पाप नाही.

८) आपण आपल्या देहावरची धूळ क्षणात झटकू शकतो. मात्र मनावर, आपल्या विचारांवर लागलेली धूळ प्रगाढ वाचनातूनच झटकू शकतो. म्हणून, अभ्यासातील सातत्य, वाचन हे यशस्वी आयुष्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे.



सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. जि. नांदेड
मो. 9960028899

अशा अनेक प्रकारच्या शिकवणींचा, संस्कारांचा, विचारांचा खजिना म्हणजे ''श्यामची आई'' हे पुस्तक. या पुस्तक वाचनातील अनुभव आपण नक्कीच इतरांनाही ऐकवून त्यांचेही पुस्तक वाचन, पुस्तक वाचनाची आवड, पुस्तकांशी मैत्री करण्यास नक्कीच साहाय्य करू शकतो.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत वर्षा शासकीय निवासस्थान,मलबार हिल, मुंबई येथे भारतीय मजदूर संघ च्या प्रतिनिधीमंडळाची विविध कामगार विषयांवर महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



या बैठकीत दि. १६ एप्रिल २०२६ रोजी भारतीय मजदूर संघाने काढलेल्या मोर्च्यानंतर राज्य शासनास सादर करण्यात आलेल्या निवेदनातील विविध मागण्यांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली.भारतीय मजदूर संघाच्या मागण्यांवर शासनस्तरावर लवकरच उच्चस्तरीय बैठक आयोजित करून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले.

बैठकीत भारतीय मजदूर संघाने नवीन लेबर कोडमधील कामगारविरोधी तरतुदींबाबत संघटनेची भूमिका स्पष्ट केली. कामगारांच्या हिताला बाधा आणणाऱ्या तरतुदी रद्द करण्यात याव्यात तसेच लेबर कोडच्या कक्षेबाहेर राहणाऱ्या कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा,अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय खालील प्रमुख मागण्या शासनासमोर मांडण्यात आल्या:

राज्यात कर्मचारी राज्य विमा योजना प्रभावीपणे राबविणे.

बोनस पात्रता मर्यादा ₹४२,००० पर्यंत वाढविणे.

राज्य शासनांतर्गत कार्यरत कंत्राटी कामगारांसाठी हरियाणा पॅटर्न लागू करणे.

कामगार कपात नुकसानभरपाईची मर्यादा ६० दिवसांपर्यंत वाढविणे.

निवृत्तीवेतनधारकांना किमान ₹२,००० मासिक पेन्शन देण्यासाठी पाठपुरावा करणे.

भगवान श्री विश्वकर्मा जयंतीला शासकीय सणाचा दर्जा देणे.

विडी कामगारांना किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी करणे.

राज्यातील विविध कामगार मंडळे व समित्या तातडीने स्थापन करून त्यामध्ये भारतीय मजदूर संघाला योग्य प्रतिनिधित्व देणे.

माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळाशी संबंधित प्रकरणे दिवाणी न्यायालयाऐवजी कामगार न्यायालयात चालविण्यासाठी आवश्यक कायदेशीर बदल करणे.

घरेलू कामगार, बांधकाम कामगार, आशा सेविका, अंगणवाडी सेविका,फेरीवाले, वीज कामगार,वीज कंत्राटी कामगार, विमानतळ टॅक्सी चालक, इंडियन एअरलाईन्स रोजंदारी कामगार, लिपिक संघ, एसटी महामंडळ, सुरक्षा रक्षक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पेन्शन, बचत गट संस्था निधी, मेट्रो कामगार आदी विविध क्षेत्रांतील प्रलंबित प्रश्नांवर स्वतंत्र बैठका आयोजित करणे.

माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेली प्रमुख आश्वासने

बोनस पात्रता मर्यादा ₹४२,००० करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल.

कर्मचारी राज्य विमा () संदर्भात स्वतंत्र बैठक लवकरच आयोजित करण्यात येईल.

भगवान श्री विश्वकर्मा जयंतीसह इतर महत्त्वाच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

शासनस्तरावर अंतर्गत बैठक घेऊन भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींशी पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात येईल.

वीज उद्योगाशी संबंधित प्रश्नांवर स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येईल.


या बैठकीस भारतीय मजदूर संघाच्या वतीने राष्ट्रीय सचिव ॲड.अनिल ढुमणे, महाराष्ट्र प्रदेश महामंत्री किरण मिलगिर, विदर्भ प्रदेश महामंत्री गजानन गटलेवार, सहक्षेत्र संघटन मंत्री मोहन येणुरे उपस्थित होते.

शासनाच्या वतीने मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, महेश पोहनेरकर तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अशी माहिती भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेशचे उपाध्यक्ष सचिन मेंगाळे यांनी दिली.

# मायलेकींच्या यशाचा दुहेरी आनंद!

**ज्योतिर्मय साहित्य**

जिद्द, सातत्य, अभ्यास आणि योग्य मार्गदर्शन यांच्या बळावर प्रत्येक संधीचे यशात रूपांतर करता येते, याचे सुंदर उदाहरण म्हणजे सौ. मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर आणि त्यांची कन्या कु. मैत्रेयी. शिक्षण विवेक काव्य अभिवाचन स्पर्धेत सौ. मानसी सोनपेठकर (संचालिका - अभिज्ञान, पुणे तथा शिक्षिका - डीईएम स्कूल आणि दै. ज्योतिर्मयच्या लेखिका) यांनी शिक्षक गटात वैयक्तिक पारितोषिक प्राप्त करून आपल्या प्रभावी सादरीकरणाची वेगळी छाप उमटवली.




त्याच स्पर्धेत कन्या कु. मैत्रेयी, डीईएम स्कूल च्या संघाची सदस्य म्हणून, सांघिक गटात तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संघाचा महत्त्वपूर्ण भाग ठरली.

कुटुंबात शिक्षण, संस्कार, साहित्यप्रेम आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांचे वातावरण असेल, तर त्या घरातील प्रत्येक यश संपूर्ण कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण ठरतो. ही दुहेरी कामगिरी केवळ पुरस्कार मिळविण्यापुरती मर्यादित नसून, सातत्य, समर्पण, आत्मविश्वास आणि गुणवत्तेच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. अशा यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही आणि शिक्षकांनाही निश्चितच प्रेरणा मिळेल.

**संजय व्यापारी**
**संपादक, दै. ज्योतिर्मय**

या गुणी मायलेकींचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

त्यांच्या भावी वाटचालीस उत्तरोत्तर अधिक यश, कीर्ती आणि समाधान लाभो, हीच श्रीकृष्ण चरणी प्रार्थना.

माऊली की जय जय श्रीकृष्ण! ❁❁❁




## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षांचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495

### आतुरता श्रावणाची

पुढे.....

२. उपनिषदांचे तत्त्वज्ञान

श्वेताश्वतर उपनिषद म्हणते-
एको हि रुद्रो न द्वितीयाय तस्थुः।
(३.२)

एकमेव रुद्र सर्व विश्वाचा अधिष्ठाता आहे. तसेच-
तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय। (३.८)

अर्थ : त्या परमेश्वराला जाणल्याशिवाय मृत्यूच्या पलीकडे जाण्याचा दुसरा मार्ग नाही.यावरून स्पष्ट होते की शिवोपासनेचा अंतिम हेतू ऐहिक लाभ नसून परब्रह्माची अनुभूती आहे.

३. भगवान शिवांचे स्वतःचे आराध्य - श्रीराम

गोस्वामी तुलसीदासांनी श्रीरामचरितमानसात भगवान शिवांच्या मुखातून म्हटले आहे-
सोइ मम इष्टदेव रघुवीरा।
सेवत जाहि सदा मुनिधीरा॥
श्रीराम हेच माझे आराध्य दैवत आहेत.
पुढे ते म्हणतात-
होइ अकाम जो छल तजि सेइहि।
भगति मोरि तेहि संकर देइहि॥

जो निष्काम भावाने शिवसेवा करतो, त्याला भगवान शंकर श्रीरामभक्ती प्रदान करतात. याचा अर्थ असा नव्हे की शिव आणि राम वेगळे आहेत; तर शिव भक्ताला भगवंताच्या प्रेमापर्यंत घेऊन जाणारे सद्गुरुतत्त्व आहेत.

४. शिवपुराणातील शिवतत्त्व

शिवपुराण वारंवार सांगते की भगवान शिव भक्तांच्या अंतःकरणातील अज्ञान दूर करून त्यांना ईश्वरभक्तीकडे नेतात. शिवकृपेने ज्ञान, वैराग्य आणि भक्ती यांचा उदय होतो. शिवपुराणाचा मुख्य संदेश असा आहे- भोगापेक्षा योग श्रेष्ठ, योगापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आणि ज्ञानाला पूर्णत्व देणारी भगवद्भक्ती सर्वोच्च आहे.

५. श्रीमद्भागवतातील भगवान शिव

भगवान शिव स्वतः पार्वतीला सांगतात-
आराधनानां सर्वेषां विष्णोराराधनं परम्।
तस्मात्परतरं देवि तदीयानां समर्चनम्॥
सर्व आराधनांमध्ये भगवान विष्णूंची आराधना श्रेष्ठ आहे; आणि त्यांच्याही भक्तांची सेवा त्याहून श्रेष्ठ आहे.
तसेच भागवत (१२.१३.१६) म्हणते-
वैष्णवानां यथा शम्भुः।
सर्व वैष्णवांमध्ये भगवान शंभू श्रेष्ठ आहेत. याचा अर्थ शिव स्वतः भगवंताच्या प्रेमभक्तीचे सर्वोच्च आदर्श आहेत. (क्रमशः)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'मामा' (माहेरचा समृद्ध दुवा)

पुढे.......

नवरदेवाचे मामा आणि नवरीचे मामा यांनी अंतरपाट धरल्याशिवाय तर आपल्याकडे लग्नच लागत नाही! तो एक प्रकारे मामाने भाच्याला आणि भाचीला दिलेला प्रेमळ आशीर्वादच असतो.

भाच्यांच्या लग्नात मंडपात 'मामाचा मान' आणि त्यांनी दिलेली भेट ही केवळ वस्तू नसते, तर त्यात आपल्या बहिणीच्या संसाराबद्दलची अखंड कृतज्ञता साठलेली असते. बऱ्याच समाजात अजूनही मामाची मुलगी करण्याची प्रथा आहे. जेव्हा मामांची मुलगी लग्न होऊन आत्याकडे सून म्हणून येते तेव्हा त्या निमित्ताने दुसरी पिढी पुन्हा जोडली जाते. नात्यांचा गोफ आणखी घट्ट होतो.

आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे सुट्ट्यांमध्ये मामाच्या गावाला जाण्याचे प्रमाण थोडे कमी झाले असले,

तरी 'मामा-मामी' या नात्यातील ओलावा आणि आपुलकी आजही तशीच टिकून आहे.

आजच्या बदलत्या काळातही भाच्यांशी मित्रासारखे नाते जपणारा, त्यांच्या करिअरच्या आणि आयुष्याच्या टप्प्यावर पाठीवर विश्वासाचा हात ठेवणारा मामा आणि मायेची सावली देणारी मामी आजही तितकेच हवाहवासे वाटतात. नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा मामा-मामीचा पदर माहेरच्या मायेचा समृद्ध सुगंध घेऊन येतो. हा पदर जेवढा प्रेमाने आणि आदराने जपला जाईल, तेवढं आपलं कुटुंब आणि आपले आयुष्य अधिक आनंदी व सुकर होईल!

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### सोशल मीडियावरील आयुष्य आणि वास्तवातील आयुष्य

रात्री झोपण्यापूर्वी आपण हातात मोबाईल घेतो. एकामागून एक फोटो, व्हिडिओ, रील्स, यशोगाथा, परदेश प्रवास, वाढदिवस, नवीन गाडी, आलिशान घर... सगळं काही इतकं सुंदर दिसतं की नकळत मनात एक प्रश्न येतो-

"सगळेच इतके आनंदी आहेत... मग फक्त मीच का दुःखी आहे?"

याच एका विचाराने अनेकांच्या आनंदाची चोरी होते. सोशल मीडियावर आपण लोकांच्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षण पाहतो; पण वास्तवात प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष, अश्रू, अपयश, एकटेपणा आणि न बोललेली वेदना असते. फरक एवढाच-ती कॅमेऱ्यासमोर येत नाही.

एखाद्या कुटुंबाचा हसरा फोटो पाहून आपल्याला वाटतं, "किती सुखी कुटुंब!" पण तो फोटो काढण्याच्या काही मिनिटांपूर्वी त्यांच्यात वाद झाला असेल, हे आपल्याला माहीत नसतं.

कोणीतरी आई-वडिलांपासून हजारो किलोमीटर दूर राहून "हैप्पी फॅमिली" लिहितो...

कोणीतरी कर्ज काढून घेतलेल्या गाडीसमोर हसत फोटो काढतो...

कोणीतरी तुटलेल्या नात्याचं दुःख लपवण्यासाठी रोज नवे स्टेटस टाकतो... आणि आपण...

त्या एका फोटोवरून त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा हेवा करतो. किती विचित्र आहे ना?

आज घरात चार माणसं एकाच सोफ्यावर बसलेली असतात... पण प्रत्येकजण वेगवेगळ्या पडद्यावर जगत असतो. आईच्या डोळ्यांत बोलण्याची आस असते...

वडिलांना दोन शब्द ऐकायचे असतात...

मुलांना फक्त थोडा वेळ हवा असतो...

पण आपण म्हणतो...

"एक मिनिट... ही रील पाहतो."

आणि हे "एक मिनिट" कधी नात्यांमधलं अंतर बनतं, ते कळतही नाही.

लक्षात ठेवा... आयुष्य म्हणजे पोस्ट नाही...
आयुष्य म्हणजे उपस्थिती.
मुलांच्या बालपणात उपस्थित राहणं.
आई-वडिलांच्या वृद्धपणात उपस्थित राहणं.
मित्रांच्या संकटात उपस्थित राहणं.
आणि स्वतःच्या मनाजवळही उपस्थित राहणं.

एक दिवस...
तुमच्या सोशल मीडियाचं अकाऊंट बंद होईल.
पोस्ट हरवतील. रील्स विसरल्या जातील.
लाईक्स मोजणारा कोणीही उरणार नाही.
पण...
तुम्ही कोणाच्या आयुष्यात दिलेला वेळ...
तुम्ही दिलेला आधार... तुमच्या प्रेमाने सावरलेलं एखादं मन... हीच तुमची खरी ओळख राहील.

म्हणून पडद्यावरचं आयुष्य सुंदर दाखवण्यापेक्षा... वास्तवातील आयुष्य सुंदर जगण्याचा प्रयत्न करा.

डिजिटल शांतता (Digital Detox) पाळा आणि स्वतःच्या साध्या, प्रामाणिक जगण्याचा आदर करायला शिका.

जेव्हा तुम्ही सोशल मीडियाच्या आभासी शर्यतीतून बाहेर पडून वास्तवातील आयुष्याचा आनंद घ्यायला लागाल, तोच तुमचा खरा 'विजय' असेल!

हा विजय तुम्हाला स्क्रीनवरचे व्हर्च्युअल 'लाइक्स' देणार नाही, पण तुमच्या मनात एक अथांग शांती आणि तृप्ती निर्माण करेल. दुसऱ्याच्या फिल्टर केलेल्या आयुष्याशी तुलना करून स्वतःची शांतता गमावू नका. वास्तव जितके साधे असेल, तितके आयुष्य सुंदर असते. मोबाईलचा स्क्रीन बंद करा आणि आयुष्याचा खरा कॅनव्हास अनुभवायला शिका... हाच 'विचार ते विजय' या प्रवासाचा खरा मार्ग आहे!

# संवाद हरवला आहे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

(मागील अंकावरून)

मात्र आजकाल हरवणारा संवाद ही आधुनिक जीवनशैलीतील मोठी समस्या निर्माण झाली आहे.

आज सर्वांनाच भेडसावणार हा प्रश्न आहे. ज्या घरात वयस्क व्यक्ती आहेत, निवृत्तीमुळे त्यांना भरपूर वेळ असतो. मित्र मंडळी भेटण्याची ठरावीक वेळ असते. त्यामुळे दिवसभर संवाद कुणाशी करायचा? असा प्रश्न उपस्थित होतो. कुटुंब छोटे, आजी आजोबांचा अभाव असल्याने व मुलांचे आई बाबा दोघेही जॉब करत असतील तर तर शाळेत जाणाऱ्या मुलांच्या बाबतीत सुद्धा मनातलं सांगायला, विचारायला. आई बाबा घरी नसतात.अशा वेळी घरातील मुल एकलकोंडे होण्याची शक्यता असते. त्यात घरी आल्यावर पालक बऱ्याचदा लॅपटॉप किंवा फोन मध्ये बिझी असतील तर मुलांनी कुणाशी बोलायचे? प्रत्येक वयाच्या मुलांचे आणि मुलींचेही प्रश्न वेगळे असतात. त्या प्रश्नच समाधान कसं होणार? लहान मुलांच्या मनातील प्रश्नाचं, शंकाच निरसन कसं होणार?

आणि ते व्हायलाच हवं. लहान मुलांची जडण घडण अजून व्हायची असते. ती आई,बाबा, आजी आजोबा,मोठे भाऊ बहीण, शाळेत सर अथवा मॅडम, यांच्याशी झालेल्या संवादातूनच होते ना? मग त्यांच्याशी



संवाद कोण करणार?

वेळे अभावी संवाद हरवत चालला आहे का?

संवाद कमी होण्याचे अजून काही करणे आहेत.




सध्या डिजिटल युग पुढे पुढे जात आहे. एआय सारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे संवाद साधण्याची फार कमी गरज पडते. काही अडले तर ए आयला विचारा. कुणाशी बोलायची काय गरज? अशी सर्वांची धारणा झालेली आहे. मोबाईलचा अति वापर,व्यस्त जीवनशैली आणि हो माणसातील भावना शून्यता या गोष्टी मुळे संवाद हरवतो आहे. संवाद कमी झाल्याने प्रेम, आदर, जिव्हाळा, या गोष्टी कमी होत चालल्या आहेत.

नात्यात दुरावा होऊन माणसं एकमेकांपासून दूर होऊ लागली आहेत. सुख दुःख सांगणे कमी झाले आहे. म्हणजेच सध्याच्या आभासी जगात मेसेज वर काम भागवले जाते. मेसेजवरचा संवाद क्षणिक बरा वाटत असला तरी प्रत्यक्ष संवादाचा आनंद त्यात मिळत नाही. एकत्र जमल्यावर झालेला गप्पांच फड, एकमेकांच्या भावना जपत झालेला संवाद,चेष्टमस्करित पिकलेले जोराचा हशा.. एकमेकांच्या हातावर दिलेल्या टाळ्या, जणू संवादाचा खळखळ वाहणारा झरा.

या सगळ्याची आजकाल उणीव दिसून येते.

सगळं जग आभासी होत चाललं आहे. मेसेज तोही तोकडा, त्यातून काय संवाद होणार छे !

संवाद मनामनांना एकत्र बांधून ठेवणारा, भावनांचा एक आनंदी झरा ! हे सारं आता हरवून गेलंय. सोशल मिडीयाचा वापर थोडा नियंत्रीत करून पाहिल्यासारखं सगळेच एकमेकांशी वागायला लागले, बोलायला लागले तर किती छान होईल ना?

हे अगदी बरोबर आहे की नवीन टेक्नॉलॉजीशी जुळवून घेता आलाच पाहिजे, पण कुठे तरी मनाला आवर घालायला हवा. मोबाईल व सोशल मिडिया वापरणं सिमित असायला हवं.

कारण माणूस हा कुटुंब वत्सल प्राणी आहे. एकत्र कुटुंब पद्धती आपली परंपरा आहे. नाती पुन्हा उजळून जायला हवी असेल तर प्रत्यक्ष संवाद व्हायलाच हवा.पटतंय ना?

चला,तर मग आपण सारे आत्मपरीक्षण करू या,सकारात्मक विचार करू या, एकमेकांशी संवाद साधू या आणि माणूस असल्याची ग्वाही देऊ या.

असे केले तरचं पुन्हा सर्व नाती नव्याने फुलतील, बहरतील, आणि जगण्याचा आनंद देतील.

हो ना?

# व्यासंगी संपादक आणि ललित लेखक

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



व्यासंगी संपादक आणि ललित लेखक श्रीनिवास विनायक कुलकर्णी हे आवडीचे लेखक होते, त्यांचे डोह,सोन्याचा पिंपळ, कोरडी भिक्षा ही ललित लेख संग्रहाची पुस्तक पुन्हा एकदा वाचावीत अशीच आहेत.

२००० या वर्षी त्यांच्या सोबतच रामदास फुटाणे, भारत सासणे, विठ्ठल वाघ, डॉ.गंगाधर पानतावणे यांच्यासह मलाही राज्य पुरस्कार मिळाला होता, विशेष म्हणजे हा समारंभ छत्रपती संभाजीनगर येथे संत एकनाथ मंदिरात झाला.त्यावेळी श्रीविंची भेट तर झालीच पण एक चांगली मुलाखतही मिळाली, अर्थात ती सासने यांच्या घरीच झाली होती.साहित्य कला, संस्कृती अशा किती तरी विषयावर ते भरभरून बोलत होते.




तेव्हा पासून पासून त्यांचा पत्र संपर्क होता.

प.महाराष्टात अनेक निमित्ताने गेलो, पण क-हाड येथे त्यांच्या घरी जाऊन भरपूर गप्पा मारायचे राहुन गेले होते,मात्र तीन वर्षांपूर्वी नवी दिल्ली साहित्य संमेलन स्मरणिकेसाठी अध्यक्ष डॉ.ताराबाई भवाळकर यांची मुलाखत घ्यायची होती, अर्थात ती मुलाखत छानच झाली, परतीच्या प्रवासात असताना क-हाडला श्रीविंकडे थोडं थांबू,असे अल्प नियोजन केले. त्यांचे सुपुत्र उदयन कुलकर्णी यांना आधी कळवले होते.

त्यांच्या घरी दुपारचे जेवण झाल्यावर तास/ दीड तास छान गप्पा झाल्या. या गप्पा म्हणजे फक्त मजेशीर संवाद. त्यांना ऐकू येण्याचा प्रश्न होता.सावकाश हळूहळू बोलतं करीत हा संवाद सुरू होता, शेवटी पाटीवर प्रश्न लिहायचा मग ते उत्तरही पाटीवरच लिहित किंवा तेवढे बोलत. प्रकृती तेव्हाही बरी नव्हतीच, पण आवडीच्या विषयावर बोलण्याचा त्यांचा उदंड उत्साह होता.पुन्हा भेटू असे सांगून त्यांचा निरोप घेतला.

आज हे सर्व दुःखद प्रसंग निमित्ताने आठवले.

श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना भावपूर्ण श्रध्दांजली

## पर्वती येथील "कौशिक आश्रम" येथे भव्य रक्तदान शिबिर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुणे – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चतुर्थ सरसंघचालक प.पू.राजेंद्रसिंह जी तथा रज्यूभैय्या यांच्या स्मृतिदिनानिमित्त पर्वती येथील मित्रमंडळ कॉलनी मधील ''कौशिक आश्रम'' येथे येत्या रविवारी नऊ ऑगस्ट रोजी कौशिक आश्रम व

अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रक्तदान शिबिर आयोजनचे यंदाचे हे २२ वे वर्ष आहे.

सकाळी आठ वाजता ''पूना गणेशखिंड लायन्स क्लब''चे अध्यक्ष विकास अग्रवाल यांच्याहस्ते ह्या शिबिराचे उद्घाटन होणार असून डॉ कदम डायग्नोसिस सेंटरचे संचालक डॉ विजय कदम ह्यांची प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य उपस्थिती राहणार आहे.

''जनकल्याण रक्तपेढी''च्या सहकार्याने हे शिबिर कौशिक आश्रमच्या नूतन वास्तूमध्ये रविवार दिनांक ९ ऑगस्ट रोजी पहिले रक्तदान शिबिर संपन्न होणार आहे.

तरी जास्तीत जास्त जणांनी सकाळी आठ ते पाच या वेळेत मोठ्या संख्येने रक्तदान करावे असे आवाहन कौशिक आश्रम व अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने करण्यात आले आहे

रक्तदान – सर्वश्रेष्ठ दान

# अति घाई...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




संध्याकाळचे सात वाजायला आले होते आणि मानसीच्या घरामध्ये एकाच वेळी युद्धाची परिस्थिती निर्माण झाली होती. मानसीची ही जुनीच सवय होती, कोणतेही काम वेळेवर करायचे नाही आणि मग शेवटच्या क्षणी अशी घाई करायची की जणू जगाचा शेवट होणार आहे! त्यात आजचा दिवस तर अजूनच गडबडीचा होता. पती समीरचा फोन येऊन गेला होता, ''मानसी, मी आज ऑफिस मधील कामामुळे खूप थकलोय आणि भूकही भयंकर लागली आहे. घरी पोहोचतोय पुढच्या अर्ध्या तासात, काहीतरी मस्त जेवण तयार ठेव.''

समीरचा फोन कट झाला आणि मानसीच्या पायाखालची जमीन सरकली. तिने घड्याळाकडे पाहिले ६:४५! फ्रिज उघडून पाहिले तर भाजीचा पत्ता नाही, कणिक भिजवायची बाकी होती, आणि गॅसवर ठेवलेले दूध उकळून बाहेर येण्याच्या तयारीत होते.

''अरे देवा! आता ३० मिनिटांत मी काय बनवणार?'' मानसी स्वतःशीच ओरडली.




तिने घाईघाईने गॅस बंद केला. तिच्या डोक्यात विचार आला, स्वयंपाकघरात तासभर उभे राहून स्वयंपाक करण्यापेक्षा झटपट काहीतरी मागवणे हाच एकमेव पर्याय आहे. आजकालच्या डिजिटल जगात भुकेवर मात करायचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे ऑनलाइन फूड डिलिव्हरी.

तिने मोबाईल उचलला आणि पटकन फूड डिलिव्हरी ॲप उघडले. तिच्या हाताची बोटे स्क्रीनवर वाऱ्याच्या वेगाने फिरू लागली. समीरला पिझ्झा प्रचंड आवडायचा. त्यातही त्याच्या आवडीचा पिझ्झा म्हणजे चिझी मॅक्स, लोडेड व्हेजीज, टॉपिंग्स, डबल चिझ बर्स्ट!

मानसीने मेनूमध्ये जास्त न बघता घाईघाईत तो महागडा स्पेशल पिझ्झा कार्टमध्ये ॲड केला. एक्स्प्रेस डिलिव्हरीचा पर्याय निवडला. पैसे ऑनलाईन भरले आणि सुटकेचा निश्वास सोडला.

''हं, झाली सोय! आता फक्त १५ मिनिटांत गरम-गरम पिझ्झा हजर होईल,'' तिने स्वगत म्हटले.

मानसी हॉलमध्ये गोल-गोल फेऱ्या मारत होती. घड्याळाचा काटा जसा पुढे सरकत होता, तशी तिची अस्वस्थता वाढत होती. बरोबर ७:१५ वाजता दारावरची बेल वाजली. मानसीने पळत जाऊन दार उघडले. दारात एक तरुण डिलिव्हरी बॉय उभा होता. त्याच्या हातात तो लाल रंगाचा उष्णता रोखणारा बॉक्स होता. त्याच्या कपाळावर घामाचे थेंब होते. **(क्रमशः)**

# ग्रंथांचे मंदिर आणि प्राण्यांचे साम्राज्य (भाग बारावा)

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



व्हिएन्नामधला पुढचा दिवस दोन अगदी वेगळ्या, पण तितक्याच अविस्मरणीय अनुभवांनी भरलेला होता. पहिला थांबा होता ऑस्ट्रियन नॅशनल लायब्ररी आणि तिचे हृदय म्हणजे प्रुंकझाल (स्टेट हॉल) नावाचे भव्य दालन. जगातल्या सर्वात सुंदर ग्रंथालयांपैकी एक मानले जाणारे हे ठिकाण पाहून आम्ही अक्षरशः थक्क झालो.

आत पाऊल टाकताच समोर उभी राहिली शतकांची अनमोल जाणीव. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी, बरोक शैलीत बांधलेले हे विशाल दालन, जमिनीपासून छतापर्यंत जाणारी लाकडी कपाटे, आणि त्यांत रचून ठेवलेली दोन लाखांहून अधिक जुनी, चामड्याने बांधलेली पुस्तके. मधोमध उंच घुमट, त्यावर रंगवलेली भव्य छतचित्रे, आणि जागोजागी संगमरवरी पुतळे व जुने पृथ्वीगोल. सोनेरी प्रकाशात न्हाऊन निघालेल्या त्या ग्रंथांच्या रांगा पाहताना जणू ज्ञानाच्या एका पवित्र मंदिरात उभे असल्यासारखे वाटत होते. पुस्तकांवर प्रेम करणाऱ्या कुणासाठीही ही जागा म्हणजे स्वर्गच. इथे आम्ही बराच वेळ नुसते त्या शांततेत, त्या सौंदर्यात हरवून गेलो.




या दालनाचा इतिहासही तितकाच रंजक आहे. हे भव्य प्रुंकझाल पवित्र रोमन सम्राट सहावा कार्ल याच्या आज्ञेवरून, इ.स. १७२३ ते १७२६ या काळात बांधले गेले. त्याची रचना केली ती त्या काळातील प्रसिद्ध वास्तुविशारद योहान बर्नहार्ड फिशर फॉन एर्लाख याने तोच, ज्याने शॉनब्रुन राजवाड्याचीही रचना केली. मात्र बांधकाम पूर्ण होण्याआधीच त्याचे निधन झाले, आणि ते काम त्याचा मुलगा योझेफ एमानुएल याने तडीस नेले. मूळात हे शाही दरबारातील ग्रंथालय होफबिब्लिओथेक होते, म्हणजे हॅब्सबर्ग सम्राटांचे खासगी ग्रंथभांडार. सुमारे ऐंशी मीटर लांब आणि वीस मीटर उंच असलेले हे दालन युरोपातील सर्वात मोठ्या बरोक ग्रंथालयांपैकी एक मानले जाते.

घुमटावरचे ते नेत्रदीपक छतचित्र दरबारी चित्रकार डॅनिएल ग्रान याने रंगवले आहे, आणि त्यात सम्राट कार्लचे देवत्वाला पोहोचणे चितारले आहे. घुमटाच्या बरोबर खाली, दालनाच्या मध्यभागी, रोमन सम्राटाच्या थाटात उभा असलेला सहाव्या कार्लचा संगमरवरी पुतळा आणि त्याच्याभोवती हॅब्सबर्ग घराण्यातील राजे-सरदारांचे आणखी सोळा पुतळे. एका बाजूला युद्ध आणि दुसऱ्या बाजूला शांती अशी पुस्तकांची व सजावटीची विभागणी. आणि कोपऱ्यांत उभे असलेले ते चार भव्य पृथ्वीगोल सतराव्या शतकातले, व्हिन्चेन्झो कोरोनेली या फ्रान्सिस्कन साधूने बनवलेले, जे हॅब्सबर्ग साम्राज्याचा विस्तार अभिमानाने दर्शवतात. इतका इतिहास, इतकी कला, आणि इतके ज्ञान एका छताखाली एकवटलेले पाहून मन थक्क होऊन गेले.

तिथून आम्ही निघालो एका पूर्णपणे वेगळ्या जगाकडे शॉनब्रुन प्राणिसंग्रहालय. आणि या ठिकाणाचे एक खास वैशिष्ट्य आहे. हे जगातले सर्वात जुने, अजूनही सुरू असलेले प्राणिसंग्रहालय आहे! सुमारे इ.स. १७५२ साली, म्हणजे तब्बल पावणेतीनशे वर्षांपूर्वी सम्राटांच्या मनोरंजनासाठी हे उभारले गेले, आणि आजही ते तितक्याच दिमाखात सुरू आहे. शॉनब्रुन राजवाड्याच्याच परिसरात वसलेले हे संग्रहालय.

प्रवेशद्वारापाशीच आमचे स्वागत झाले ते एका अतिशय देखण्या, नीटनेटक्या बागेने. रंगीबेरंगी फ ुलांचे भूमितीय आकारात मांडलेले ताटवे, कातरून सुबक आकार दिलेली हिरवीगार झुडपे, आणि मधूनच वाट दाखवणाऱ्या स्वच्छ पायवाटा. प्रत्येक झाड, प्रत्येक फूल जणू मोजूनमापून लावल्यासारखे इथल्या माणसांची शिस्त आणि सौंदर्यदृष्टी पावलोपावली जाणवत होती. या बागेतून चालतच आम्ही आत शिरलो, आणि पुढच्या अद्भुत जगाची चाहूल लागली.

आत बरोक शैलीतली जुनी, वर्तुळाकार रचना अजूनही जपलेली आहे, आणि त्याच्याभोवती आधुनिक, प्रशस्त पिंजरे. इथे आम्ही जगभरातले असंख्य प्राणी पाहिले. पण सर्वात मोठे आकर्षण होते ते चीनहून आलेले भलेमोठे, गुबगुबीत जायंट पांडा! बांबू कुरतडत निवांत बसलेले ते पांडा पाहून लहान-मोठे सगळेच हरखून गेले. सोबतच सिंह, वाघ, हत्ती, जिराफ, ध्रुवीय अस्वले आणि रंगीबेरंगी पक्षी. मुलांसाठी तर हा खजिनाच होता. पाण्यात मजेत डुंबणारे आणि काठावर रांगेने डुलत चालणारे गोंडस पेंग्विन पाहून तर सगळ्यांच्याच चेहऱ्यावर हसू फुलले. खरं सांगायचं तर, प्रत्यक्षात पेंग्विन मी पहिल्यांदाच पाहत होते. आजवर फक्त टीव्हीवर आणि फोटोंतच पाहिलेले हे पक्षी समोर, अगदी हाकेच्या अंतरावर बागडताना पाहणे ही माझ्यासाठी खूपच खास, आनंददायी गोष्ट होती. इतिहास आणि निसर्ग यांचा असा अनोखा संगम इथेच पाहायला मिळाला.

दिवसभर भरपूर भटकून, संध्याकाळी आम्ही संग्रहालयातल्याच एका जुन्या, ऐटबाज मंडपात कॉफीसाठी विसावलो. थकलेल्या पायांना आराम देत, गरमागरम कॉफीचे घोट घेत, आजूबाजूच्या हिरवाईकडे आणि मावळत्या उन्हाकडे बघत बसणे हा क्षण दिवसभराच्या धामधुमीवर एक शांत, समाधानी पडदा टाकणारा होता. व्हिएन्नाच्या त्या निवांत संध्याकाळी, कॉफीच्या वाफेसोबत आम्ही या अविस्मरणीय दिवसाच्या आठवणीही मनात साठवत होतो.

एका दिवसात ग्रंथांचे शांत मंदिर आणि प्राण्यांचे जिवंत साम्राज्य, व्हिएन्नाने आम्हाला दोन टोकांचे, पण तितकेच समृद्ध करणारे अनुभव दिले.



# ऋतू हिरवा, ऋतू बरवा

डॉ. मीना श्रीवास्तव मो. 99201 67211

पुढे......

किती हा हिचा जाच! मग तिची विनवणी अन लांगूल चालन करावे लागणारच ना.

'ए आई मला पावसात जाऊ दे,
एकदाच ग भिजुनी मला चिंब चिंब होऊ दे'

(आमच्या अति लाडक्या कवयित्री-वंदना विटणकर)

अन एकदाचं बाहेर पडलं की धुमशान पळतंय कसं बघा पोरगं पावसाच्या सरी झेलायला, अन गम्माडी गंमत करायला, दोस्तांबरोबर फेर धरत गाणी हवीच-

'पिरपिर पिरपिर पावसाची,
त्रेधा तिरपिट सगळ्यांची'

(परत वंदनाताईच हो) किंवा झालंच तर

'अग्गोबाई ढग्गोबाई, लागली कळ ।
ढगाला उन्हाची केवढी झळ ।
थोडी न् थोडकी लागली फार ।
डोंगराच्या डोळ्याला पाण्याची धार ।।'

(कवी- संदीप खरे)

मैत्रांनो, आता जाऊ या तिथं, जिथं राधा अधीर होऊन म्हणतेय

'रिमझिम पाऊस पडे सारखा,
यमुनेलाही पूर चढे,
पाणिच पाणी चहूकडे ग बाई
गेला मोहन कुणीकडे?'

(जनकवी पी. सावळाराम) निसर्ग कवी बा. भ. बोरकरांची 'सरींवर सरी आल्या ग' ही सदा प्रफुल्लित कविता आठवते कां? गोकुळात बरसणारा पाऊस, हिरवेगार कदंब वृक्ष, यौवनाच्या उंबरठ्यावर थबकलेल्या वेली, मेघांची गर्जना, विजेची पैंजणे आणि कृष्णधुन आळवणारी त्याची वेणू, यांच्या तालासोबत मनमोहक रंगांनी सजलेले आपले पिसारे फुलवीत मिरवणारे मयूर! त्यांच्यासोबत दुग्धधारांसारख्या भासणाऱ्या धवल जलधारांत सचैल न्हालेल्या गोपींचे कृष्णाशी एकरूप होण्याचे वर्णन बोरकरांनीच करावे! (ही समग्र कविता ऐकावी यू ट्यूब वर पु. ल. आणि सुनीताबाई देशपांडेंच्या स्वरात!)

सरिंवर सरी: सरिंवर सरी....
सरिंवर सरी आल्या ग,
सचैल गोपी न्हाल्या ग
गोपी झाल्या भिजून-चिंब,
थरथर कापती निंब-कदंब
घनांमनांतुन टाळ-मृदंग,
तनूंत वाजवी चाळ अनंग
पाने पिटिती टाळ्या ग,
सरिंवर सरी आल्या ग
मल्हाराची जळांत धून,
वीज नाचते अधुनमधून
वनांत गेला मोर भिजून,
गोपी खिळल्या पदी थिजून
घुमतो पावा सांग कुठून?
कृष्ण कसा न उमटे अजून?
वेली ऋतुमति झाल्या ग,
सरिंवर सरी आल्या ग
हंबर अंबर वारा ग,
गोपी दुधाच्या धारा ग
दुधात गोकुळ जाय बुडून,
अजून आहे कृष्ण दडून
मी-तू-पण सारे विसरून,
आपणही जाऊ मिसळून
सरिंवर सरी आल्या ग,
दुधात न्हाणुनि धाल्या ग
सरिंवर सरी: सरिंवर सरी.... (क्रमशः)



# युरोप दर्शन

वामन वा. कोठेकर
मोबाईल : +91 98606 99972

## फ्रान्स

सर्वजण टूर मॅनेजर अक्षयने दिलेल्या सूचनेप्रमाणे सात वाजता ब्रेकफास्ट आटोपून बसमध्ये बसले.बस आम्हाला लंडन रेल्वे स्टेशनवर सोडणार होती आणि लंडन ते पॅरीस हा आमचा प्रवास युरोस्टार ट्रेन ने होणार होता. काही अंतर पाण्याखालून धावणाऱ्या युरोस्टार ट्रेन प्रवासाची सर्वांनाच उत्सुकता होती. आम्ही स्टेशनवर पोचलो. इथेही विमानतळासारखे इमिग्रेशन काउंटर होते कारण इथून पुढे युरोपमध्ये स्चेनगन व्हिसा लागणार होता. इमेग्रेशन पूर्ण करून आम्ही प्लॅटफॉर्मवर आलो लगेचच ट्रेन आली आणि आम्ही बोर्ड झालो. ऑटोमॅटिक डोअर मधून जाऊन आपापल्या सीट वर बसलो सुपरफास्ट अशा आलिशान युरोस्टार ट्रेन चा अनुभव सुखद होता. आज १० मे ही तारीख होती हा आमच्या लग्नाचा वाढदिवस होता. कसे माहित नाही पण हे अक्षय ला माहीत होते आणि त्याने आमच्या ग्रुप मधील काही लोकांना सांगून ठेवलं होत. ट्रेन मधे सर्वजण एकत्र येऊन त्यांनी सरप्राइज आमची वेडिंग अनिवर्सरी साजरी केली आणि आम्हाला हॅपी अनिवर्सरी शुभेच्छा दिल्या.आमच्यासाठी हा एक सुखद धक्काच होता. सर्वांना त्या निमित्त चॉकलेटचे वाटप केले आणि आभार मानले. लवकरच आम्ही फ्रान्स मध्ये पोचणार होतो.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559